Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2277 - 5730
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X, Issue - II
April - June - 2021
MARATHI PART - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

SHIVAJI COLLEGE HINGOLI

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या सामाजिक विचाराचा संवादात्मक अभ्यास<br>**विद्या मधुकरराव इंगोले** | १३२-१३४ |
| २५ | गांधी विचाराची सद्यस्थितीतील प्रस्तुतता - एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. ढाले एस. यु.** | १३५-१३९ |
| २६ | धनगर जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. एन. आर. हुरगूळे** | १४०-१४५ |
| २७ | हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात काँ. विठ्ठलराव नाईक यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर** | १४६-१५० |

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २६. धनगर जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. एन. आर. हुरगुळे**
समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

कोणत्याही जातीजमातीची प्रगती ही त्या जातीजमातीचे समाजातील सामाजिक स्थान, आर्थिक स्थिती व शिक्षणाचे प्रमाण यावर अवलंबून असते. महाराष्ट्रातील एक प्रमुख जमात म्हणून धनगरांचा जमातीचा उल्लेख केला जातो. ही जमात अनेक पोट जातीसह महाराष्ट्रात पसरलेली आहे. महाराष्ट्रात धनगर जमातीचे स्थान हे कनिष्ठ दर्जाचे आहे. आजही समाजात धनगरांचा उल्लेख येडा धनगर असा केला जातो. एखादा माणूस अडाणी माणसासारखा वागला तर त्याला काय धनगरासारखा वागलास म्हणून संबोधले जाते. धनगरांचा मुख्य व्यवसाय हा शेळ्या-मेंढ्या पाळणे व त्यावर आधारीत इतर कामे करणे हा आहे. त्यामुळे सकाळ झाली की रानोमाळ शेळ्या-मेंढ्या चारायला घेऊन जाते. ज्या भागात चारा व पाणी आहे त्या भागात शेळ्या-मेंढ्या चारायला घेऊन जाणे, त्याच ठिकाणी पाल टाकून राहणे. या अस्थिर जीवनामुळे ही जमात अज्ञानाच्या खाईत लोटली आहे. आजही ही जमात आपल्या पारंपारिक जीवन शैलीत जीवन जगतांना दिसते. धनगर ही महाराष्ट्रातील निम भटकी जमात आहे. महाराष्ट्रातील व्यापक सांस्कृतिक प्रवाहाशी एकरुप होत असतांनाही आपले पारंपारिक निराळेपण कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. या धनगर जमातीच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी "धनगर जमातीच्या सामाजिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय निश्चित केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये धनगर जमातीमधील चाली-रिती, कुलदैवत, वेशभुषा, कुटूंब पध्दती, विवाह प्रथा, सण-उत्सव, इत्यादी घटकांचे अध्ययन केले आहे.

**उद्देश**

१. धनगर जमातीतील लोकांचे सामाजिक जीवनमानाचा अभ्यास करणे.
२. धनगर जमातीमधील रुढी,प्रथा,परंपरा जाणून घेणे .
३. धनगर जमातीसमोरिल प्रश्न व समस्या जाणून घेणे.

**गृहितके**

१. धनगर जमातीतील लोकांचे जीवनमान निम्न स्तरावर आहे.
२. धनगर जमात सामाजिक जाणीवेच्या बाबतीतही अज्ञानी असुन रुढी,प्रथा,परंपराचा प्रभाव आहे.
३. धनगर जमातीच्या सामाजिक अज्ञानामुळे त्यांच्यासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत ज्यामुळे ही जमात इतर जातीजमातीच्या पाठीमागे आहे.

**धनगर जमातीचे सामाजिक जीवन**

भारत हा देश विविधतेने नटलेला आहे. या देशात अनेक जाती धर्माचे लोक एकत्र राहतात. भारतीय संस्कृती अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा यांनी बनलेली आहे. असे जरी असले तरी प्रत्येक जाती-जमातीने आपले स्वत:चे वेगळेपण आणि स्वत:ची संस्कृती जपून ठेवलेली आहे. अशा जमातीपैकी धनगर जमात ही एक महाराष्ट्रातील महत्वाची जमात आहे. या जमातीने आपली संस्कृती जपून ठेवलेली आहे. धनगर जमातीच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करतांना दिसून येते की, या जमातीचे पाळेमुळे, त्यांचे अस्तित्व, स्वतंत्र संस्कृती, जातपंचायत, रुढी परंपरा, लोककला बरीच खोलवर पसरलेली आहे. आजही धनगर समाजात लोकजीवनात पंरपरेने चालत आलेले रुढी, समजुती, आचार-विचार, धर्म, विधि, लोकभ्रम, लोकनाट्य, लोकनृत्य, सण-उत्सव, धार्मिक श्रध्दास्थळे, देवदेवता, कुलदैवता त्यांचे विधि, नवस, हुईक, सुंबरान, जागरण, वाघ्या मुरळी, ह्या परंपरा चालू आहेत.

**१. कुटूंब पध्दती**

धनगर समाजात संयुक्त कुटूंब पध्दती आढळून येते. दोन किंवा तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहतात. सर्व कारभार हा घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीकडे दिला जातो. त्याच्या आज्ञेचे पालन घरातील सर्वजण करतात. पितृसत्ताक पध्दती असल्यामुळे घरातील सर्व कारभार हा पुरुष पाहत असतो. स्त्री आणि पुरुषांच्या अधिकारांचा विचार केला तर स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते.[१] वडीलधाऱ्यांचा मान सन्मान, त्यांच्या शब्दाला असणारी किंमत, त्यांचे संस्कार व कामधंद्यामुळे व आपसातील किंवा नात्यातील मुलींशी केलेले विवाह यामुळे संयुक्त कुटूंब पध्दती आजही टिकून आहे. तर काही कुटूंबातील व्यक्तींचे मतभेद असल्याने, अपुरी साधने, कामधंद्यामुळे सतत भटकंती यामुळे कुटूंबाचे विभाजन पाहावयास मिळते.

**२. आहार किंवा खाण-पान**

धनगर समाजातील लोक हे कष्टाळू व अंगमेहनत करणारे आहेत. शेळ्या-मेंढ्या घेऊन रानोमाळ फिरणारे आहेत. त्यामुळे त्यांचा आहार हा दणकट असतो. त्यांच्या आहारात मांसाहार जास्त प्रमाणात दिसून येतो. सर्वसाधारणपणे ज्या प्रदेशात धनगर राहतात त्या प्रादेशिक खाण-पान पध्दतीने ते आपला आहार घेतात. महाराष्ट्रातील धनगर हे भाकर आणि कालवण (कोरड्यास) भोजनात घेतात. परंतु विशेष प्रसंगी नेहमीच्या भोजनात काही खास पदार्थ असतात. धनगरांच्या घरी शेळ्या-मेंढ्यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांच्या भोजनात दुधाचे पदार्थही मोठ्या प्रमाणात दिसून येतात. 'सट' या सणाच्या दिवशी भरीत व रोडगे केले जाते. तेंव्हापासून भरीताचा वापर ते आपल्या जेवणात करतात.[२] समाजात दैनंदिन जीवनात शाकाहार घेतला जातो. परंतु काही विशिष्ट दिवशी, बाजाराच्या दिवशी मांसाहार घेण्याचे प्रमाण जास्त आहे.

**३. वेशभुषा**

शेळ्या मेंढ्यांना घेऊन निसर्गाच्या सानिध्यात दऱ्याखोऱ्यात रानोमाळ भटकणारा धनगर हा आज इथे तर उद्या तिथे असे आपले जीवन जगतांना त्या जीवनशैलीशी उपयुक्त अशी वेशभुषा अंगीकारतो. धनगर पुरुषांचा पोषाख अंगात बाराबंदी कंबरेला त्रिकोणी लंगोटी, तीन पट्यातील एक पट्टा कमरेला गुंडाळलेला, दुसरा पट्टा जांगेवरुन मांधे माकडहाडापर्यंत कंबरेभोवती असलेल्या पट्याला बांधलेला आणि तिसरा पट्टा समोरच्या बाजुने लोंबकळत ठेवलेला ढोपरापर्यंत धोतर असते.



80

डोक्याला भरड कापडाचे पागोटे असते. बाकी खांद्यावर घोंगडी, पायात जाड वाहणा किंवा शिगांडा जोडा, हातात मोठी काठी, कपाळावर भंडारा लावलेला असतो. उजव्या हातात चांदीचे जाड कडे घालतात त्याला 'अंती' म्हणतात.[३]

धनगरांच्या स्त्रियांचा पोषाख हा जाड काठी लुगडे, चोळी, हातात दनकडे, कानात कुरडे, गळ्यात पानाची पोथ, पायात तोडवे, तोडे, नाकात नथ, कपाळावर आडवे कुंकु असा घरंदाज पोषाख व कणखर बाणा असतो. आधुनिक काळात धनगर समाजातील लोकांचा संपर्क हा बाह्य जगाशी येऊ लागला. त्यांच्यापैकी अनेक जण हे कामधंद्यामुळे स्थिर झाले. त्यामुळे बाह्य संस्कृतीचा व राहणीमानाचा प्रभाव त्यांच्यावर पडला आहे. त्यामुळे ते आपली पारंपारिक पोषाख पध्दती सोडून इतरांसारखी आधुनिक पोषाख परिधान करतांना दिसतात.

**४. विवाह पध्दती**

आपआपल्या धर्म, पंथ व जातीनूसार विवाह करण्याची पध्दती आहे. थोड्याफार फरकाने ही पध्दत सर्वत्र दिसून येते. आज लग्नविधीमध्ये काही बदल झाले असले तरी धनगर समाजातील लग्न ही पारंपारिक पध्दतीने होतांना दिसून येतात. लग्न लावण्यासाठी गावातील महाराजाला बोलावले जाते. त्याच्या सल्ल्यानूसार सर्व पुजाअर्चा केली जाते. लग्नाच्या अगोदरच्या दिवशी लग्न मांडव घातला जातो. मांडवात दोन बोहले घातले जातात. त्याला सारवले जाते. सालईची झाड, रांजन व मडके मांडवात ठेवले जाते. मांडवाला पाच प्रकारच्या झाडाचे जाळे रोवले जाते. त्यावर हिरव्या फांद्या टाकल्या जातात. वधुवरांच्या भाऊ बहीणीला देवक बनविले जाते. चार पाहुणे पांढरे धोतर काडीला बांधून गावातील देवाच्या पुजेला जातात. काही भागामध्ये देवक शेतामध्ये जाते. तेथे बोळक ठेवून पाच सुवासिनी त्या रानात हळद कुंकू लावून पुजा करतात. लग्न कार्यात भावकीतील सर्व लोकांना मानपान दिला जातो. सर्व लोकांना टावेल, टोपी आणि पोटझाकण दिले जाते. लग्नाच्या अगोदर जागरण गोंधळ करण्याची प्रथा आहे. काही ठिकाणी बकऱ्यांचा बळी दिला जातो. हळदीचा एक महत्वाचा विधि असतो. लग्नाच्या दिवशी नवरदेव परन्या निघतो. मंडपात आल्यानंतर गाठीभेटी होतात. नवरदेवाला शेवंती व आत ओवळणी होते. व विधिवत मंगलाष्टक म्हणत लग्न पार पाडले जाते.[४]

**५. वाघ्या - मुरळी**

धनगर समाजात लग्नाअगोदर किंवा नवसाच्या वेळी जागरण करण्याची प्रथा आहे. जागरण हे खंडोबाचे विधि नाट्य वाघ्या व मुरळी सादर करतात. खंडोबा हे महाराष्ट्रातील इतर जातीच्या लोकांचे सुध्दा कुलदैवत बनले आहे. त्यामुळे जागरण गोंधळ हा विधि इतर समाजातही पाहावयास मिळतो.

**६. सण-उत्सव**

महाराष्ट्रात अनेक जाती-जमातीचे अनेक सण-उत्सव पाहावयास मिळतात.काही सण-उत्सह हे सर्व जाती-जमाती मिळून साजरे करतात तर काही सण-उत्सव हे त्या त्या जातीपुरते मर्यादीत असतात. धनगर समाजातील लोक हे हिंदु धर्मातील जवळपास सर्व सण-उत्सव हे आपापल्या प्रादेशिक पध्दतीने साजरे करतात. त्यामध्ये दिपावली, दसरा, रंगपंचमी, आषाढी, नागपंचमी यासारख्या सणांचा समावेश होतो. या व्यतिरिक्त काही सण हे असे आहेत की जे प्रामुख्याने धनगर समाजातील लोक अतिशय उत्साहात साजरे करतात.



81

### ७. सट किंवा तळी

श्री खंडोबा हे महाराष्ट्रीयन धनगरांचे कुलदैवत आहे. या खंडोबाची सटीच्या दिवशी तळी उचलण्याची प्रथा संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येते. मार्गशीष शुक्ल प्रतिपदेच्या अमावस्येला हा सण धनगर जमात साजरा करते. तळी उचलण्यासाठी घोंगडीला मान असतो. नागवेलीचे पान, बडी सुपारी, वाटी, भंडारा, कोटंब, त्यामध्ये ज्वारी, ज्वारीमध्ये खंडोबाची मुर्ती, पंचारती, कोटंब ठेवण्यासाठी तेवढी जागा सारवली जाते. त्या सारवलेल्या जागेवर पुजेचे साहित्य माडले जाते. त्या दिवशी वाघ्याचा मान असतो. ते संपूर्ण गावभर तळी उचलण्यासाठी फिरतो. त्या दिवशी वाघ्याला जेवण घालून सन्मान केला जातो. सर्व पुजेचे सामान एका सुपात किंवा ताटात घेऊन खंडोबाची पुजा केली जाते. असे करत असतांना शिव मल्हारीचा येळकोट येळकोट जय मल्हार असा तळी उचलतांना तीन वेळा गजर करतात. बाजरीचे रोडगे हा खंडोबाचा नैवद्य दिला जातो. सटीच्या दिवशी कुत्र्याची पुजा केली जाते. कुत्र्याला भंडारा लावला जातो. त्याला भरीत आणि रोडग्याचा नैवद्य दिला जातो.

### ८. हुईक

हुईक हा भक्ताव्दारे सर्व भविष्य सांगणाऱ्यांचा विधि असतो. या विधिमध्ये बिरोबाची आराधना केली जाते. बिरोबा भक्तांच्या अंगात येतो व भक्त हे भविष्य वर्तवतात. सायंकाळच्या वेळी विजयादशमीच्या दिवशी सर्व लोक भक्ताच्या घरी गोळा होतात. लोक गोळा झाले की डफ वाजतो. भक्त, झेंडा ज्या धनगराच्या घरासमोर ठेवायचा मान असेल त्यांच्या ओट्यावर ठेवून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी लोक एकत्र येतात. विरोबाची काठी घेऊन नाचतात. नाचत नाचत विरोबाच्या मंदीराकडे जातात. त्या ठिकाणी जवळपासच्या गावातील लोक एकत्र येतात. भगत वानांच्या वह्या वाचतो. त्यावेळी भगत हिरवे पातळ परकराप्रमाणे नेसून व पागोट्यावरुन त्या पातळाचा पदर घेऊन नाचतो. त्यांच्या अंगात विरोबा येतो. विरोबा अंगात आल्यानंतर तो लोकांच्या विनंतीवरुन हुईक सांगतो. त्यात पुढील वर्षाचे भविष्य सांगतो. हा विधि मराठवाडयातील अनेक गावात दरवर्षी ठरलेल्या तिथिला पार पाडला जातो.[५]

### ९. सुंबरान

सुंबरान म्हणजे स्मरण किंवा आठवण. मांडली म्हणजे मांडणे किंवा सांगणे. विरोबाचे महात्म्य आणि त्यांच्याविषयीच्या श्रध्दा सुंबरानातून व्यक्त करतात. सुंबरानात गाण्यात निरनिराळ्या देवदेवतांना सुंबरानात आमंत्रण दिले जाते जसे[६]

सुंबरान मांडीले। सुंबरान मांडीले
तळाच्या बा वेळेला। फार वर्ष काळाला
पशुपालन कृतीला। अनेक संस्कृती जन्माला
धेनु पाल जन्माला। अनादि काळात ठरला
सुसंस्कृत जन्माला। धनगर कारणी आला

सुंबरान मेंढपाळ धनगर समाजात जास्त प्रमाणात गायले जाते.

**कुलदेवता व धार्मिक प्रथा**

भारतीय संस्कृतीमध्ये देवदेवता, धर्म यांना अनन्यसाधारण महत्व आहे. जीवन जगतांना लोकांच्या मनात निर्माण झालेली भिती आणि असुरक्षितता या कारणामुळे लोकमानसाचा देव व धर्मावर श्रध्दावर दृढ विश्वास निर्माण झाला. आणि त्यातूनच आजही धर्मविधिची परंपरा, जत्रा सुरु आहे. धनगर समाजामध्ये देवदेवतांना श्रध्देचे स्थान आहे. धनगर समाजातील लोक ३३ कोटी देव मानतात. हिंदु धर्मातील सर्वच देवदेवतांची पुजा अर्चा व उपसना करतात. असे जरी असले तरी खंडोबा, विरोबा, म्हसोबा, धुळोबा व त्या-त्या भागातील स्थानिक देवदेवता त्यांच्या कुलदैवता म्हणून ओळखल्या जातात. घरामध्ये एखादे शुभ कार्य होतांना या कुलदैवतांची पुजा-अर्चा केली जाते. या देवांना चाफ्याची व तरवड्याच्या पान फुलांची पुजा असते. हे देवस्थान शक्यतो माळ रानावर असतात. या देवांचा प्रसाद म्हणून भंडारा दिला जाते. धनगर लोक परंपरेतील देवतांचा संबंध जसा कुळाशी कुळ पुरुषांशी संबंधीत आहे तसाच ग्रामीण संस्कृतीशी आहे. धनगर ही मेंढपाळ जमात आहे. दऱ्याखोऱ्यात निसर्गाच्या सानिध्यात दिवसरात्र भटकणारा हा समाज आहे. स्वत:चे व मेंढ्याचे रक्षण करण्यासाठी तो देवाला साकडे घालतो. निसर्गाच्या घडणाऱ्या घटनांमागे देवाचा हात आहे अशी समजूत आहे. या समजेतून अंधश्रध्दा निर्माण झाली आणि या अंधश्रध्देतून अनेक देवदेवतांची निर्मिती झाली. घरामध्ये व देव्हाऱ्यात देवदेवतांच्या मुर्ती आढळून येतात. या देवदेवतांची न चुकता नित्यनियमाने पुजा-अर्चा केली जाते. धनगरांच्या देवतांचा अभ्यास करत असतांना पुढील प्रमाणे वर्गीकरण करता येते.[७]

१. **घरदेवता:-** रेणुका देवी, अंबाबाई, विठ्ठल-रुख्मीणी, खंडोबा, गणपती, देवी, रंगनाथ, मृत व्यक्तिचा टाक
२. **जातदेवता:-** विरोबा, साया-माया, खंडोबा, धुळोबा, आयक्का देवी, श्रीमाया, संत कनकदास, अहिल्याबाई होळकर इत्यादी.
३. **ग्रामदेवता:-** मारोती, लक्ष्मीआई, विर, गणपती, महादेव, विरोबा, महादेवाची पिंड इत्यादी.
४. **शिवाररदेवता:-** म्हसोबा, सटावाई, पुंजा, वीरगण, सानी-आसरा, रानाची आई, बाळुमामा इत्यादी.
५. **लोकदेवता:-** विरोबा, खंडोबा, धुळोबा, मारोती इत्यादी.

**निष्कर्ष**

१. धनगर जमातीकडे इतर जातीजमातीचा पाहण्याचा दृष्टिकोन तिरस्कारयुक्त असल्याचे दिसून येते.
२. अनेक सण उत्सवात धनगरांना मान दिला जात नाही. त्यांना डावलले जाते.
३. महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनात धनगर जमातीचे स्थान हे कनिष्ठ आहे.
४. धनगर जमातीच्या लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या रुढी, परंपरा, धर्म, कर्मकांड, लोकनाट्य; सण, उत्सव, धार्मिक श्रध्दास्थळे, देवदेवता, कुलदेवता, त्यांचे विधि, नवस, हुईक, सुंबरान जागरण, वाघ्यामुरळी ह्या परंपरा आजही चालू आहेत.

**सारांश**

महाराष्ट्रातील एक प्रमुख जमात म्हणून धनगरांचा उल्लेख केला जातो. ही जमात अनेक पोट जातीसह महाराष्ट्रात पसरलेली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात या जमातीचे स्थान कनिष्ठ आहे. तसेच या जमातीने स्वत:ची संस्कृती आणि वेगळेपण जपून ठेवले आहे. दऱ्याखोऱ्यात राहणारा धनगर आजही आपल्या पारंपारिक वेशभुषेत वावरतांना दिसतो. त्या व्यवसायाप्रती ती वेशभुषा संयुक्तीक वाटते. आजच्या आधुनिक युगात धनगरांची बाह्य जगाशी ओळख होऊ लागली आहे. काही कुटुंबे काही कामधंद्यामुळे शहराकडे वळली. काही गावात स्थायिक झालीत. यामुळे काही प्रमाणात त्यांच्या राहणीमानात, आचार-विचारात, व्यवसायात बदल झालेला दिसून येतो. तरीही त्यांच्या जीवनातील यात्रा उत्सवाचे महत्व, नवसाचे महत्व, त्यांची उपवासाची धारणा यामध्ये बदल पडलेला दिसून येत नाही. धनगर समाजाची परंपरागत मानसिकता आजही मोठ्या प्रमाणात बदललेली दिसून येत नाही. परंतु आधुनिक काळात शिक्षणामुळे ते समाजाच्या प्रवाहात आल्याने त्यांच्या राहणीमानात व विचारशैलीत वातावरणानूसार थोडा बदल झालेला दिसून येतो.

**संदर्भसूची**

१. गवते, डॉ. ज्ञानेश्वर (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, ११७.

२. मराठवाड्यातील धनगरांच्या लोकजिवनाच्या निरीक्षणावरुन.

३. गवते, डॉ. ज्ञानेश्वर (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, ११४.

४. हिंगोली जिल्ह्यातील धनगर लोकांकडून मिळालेली माहिती.

५. बीड जिल्ह्यातील धनगर लोकांकडून मिळालेली माहिती.

६. येडेकर, शाम, (२०१३), मी धनगर, कोल्हापूर, राधिका एन्टरप्राईजेस, ३२२.

७. गवते, डॉ. ज्ञानेश्वर (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, ४९५.